कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्यांची बदली

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन आदेश क्रमांक-बदली-२०१९/प्र.क्र.१९६/२०१९/आ.(शा.अ.)
मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक ,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०१ जुलै, २०१९.

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) आणि ४(५) मधील तरतुदींनुसार मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव अंतर्गत कार्यरत सहा.अभियंता श्रेणी-२ यांना नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी (स्तंभ-४ नुसार) विनंतीनुसार बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभियंत्याचे नाव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | विनंती बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. महेंद्र गणपत चौधरी, सहा.अभियंता श्रेणी-२ | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव अंतर्गत अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे | मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक अंतर्गत अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, नाशिक येथील रिक्त पदी |

२. आदेशात नमूद अभियंत्यांची ज्या कार्यालयात बदली करण्यात आली आहे, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांनी उपरोक्त आदेशातील स्तंभ-४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. आदेशात नमूद अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, बदली झालेल्या संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी त्यांना त्वरीत कार्यमुक्त करावे.

४. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, शासन स्तरावरील प्रस्तुत आदेश प्रथम कार्यान्वित करुन तद्नंतरच क्षेत्रीय स्तरावरील प्रदेशांतर्गत बदल्यांचे आदेश कार्यान्वित करावेत. शासनाने केलेल्या आदेशात क्षेत्रीय स्तरावर कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसेल अथवा अन्य कारणांमुळे बदली कार्यान्वित करण्यास प्रशासकीय अडचण उद्भवत असेल तर, अशा बाबतीत शासनास तात्काळ अवगत करुन अहवाल सादर करावा.

५. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/स.अ.श्रेणी-२ यांच्या बदलीची अंमलबजावणी करताना सदर बदलीच्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत मंजूर पदांपेक्षा जास्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सअश्रेणी-२ कार्यरत राहणार नाहीत, याची सर्वार्थाने दक्षता घ्यावी.

६. वरीलप्रमाणे बदली करण्यात येत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांच्या कार्यमुक्ती आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

७. सदरहू बदली ही विनंती बदली असल्याने उपरोक्त अभियंत्याला बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

८. संबंधित कार्यकारी संचालक/ मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी शासन पत्र क्र.संकीर्ण २०१७/(१७३/१७)/आ (वर्ग-२), दि.१२.०७.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

९. सदर शासन आदेश जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर(http://wrd.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विनायक लवटे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत -१) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२.
२) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय , मंत्रालय, मुंबई -३२.
३) प्रधान सचिव (जसं) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.
६) मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक.
७) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.
८) अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, नाशिक.
९) उ.स. (प्रशा), जलसपंदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
१०) आ. (शा.अ.) कार्यासन संग्रहार्थ.